# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२

| | |
|---|---|
| **बोर्ड क्रं. १०१ ते १०५** | **द्वितीय अपील क्रं. १०६८ ते ११४६/२०२३** |

| | | |
|---|---|---|
| ॲड. संकेत मनोज दाभाडे रा. प्लॉट नं. १२ राजधानी हाऊसिंग सोसायटी, जाखडी नगर, इंदिरानगर नाशिक ता. जि.नाशिक | अपिलार्थी | उपस्थित (प्रतिनिधी) |

**विरुध्द**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०१ व १०२ | १०६८ व १०६९/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक | उत्तरवादी क्र.२ | उपस्थित (प्रतिनिधी) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०३ व १०४ | १०७१ व १०७२/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी ग्रा. पं. , पंचायत समिती, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक | उत्तरवादी क्र.२ | अनुपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०५ | ११४६/२०२३ | जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी ग्रा. पं. , पंचायत समिती, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक | उत्तरवादी क्र.२ | अनुपस्थित |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**( सुनावणी दिनांक ०४.०८.२०२६ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०५ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २२.११.२०२२ | आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देणेसाठी पंचायत समिती स्तरावर तयार केलेल्या मुल्यमापन गुणाकंन यादीची व त्यासंबधीची सादर केलेल्या टिप्पणीची प्रत |
| १२.१२.२०२२ | आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देणेसाठी प्रत्येक ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांची तयार केलेल्या मुल्यमापन गुणाकंन यादीची व त्यासंबधीची सादर केलेल्या टिप्पणीची प्रत |
| १२.१२.२०२२ | आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देणेसाठी प्रत्येक ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांची तयार केलेल्या मुल्यमापन गुणाकंन यादीची व त्यासंबधीची सादर केलेल्या टिप्पणीची प्रत |

| | |
|---|---|
| २२.११.२०२२ | आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देणेसाठी पंचायत समिती स्तरावर तयार केलेल्या मुल्यमापन गुणाकंन यादीची व त्यासंबधीची सादर केलेल्या टिप्पणीची प्रत |
| २२.११.२०२२ | आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देणेसाठी प्रत्येक ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांची तयार केलेल्या मुल्यमापन गुणाकंन यादीची व त्यासंबधीची सादर केलेल्या टिप्पणीची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत व दिशाभुल करणारी दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी संपुर्ण जिल्हातील पंचायत समितीकडे माहिती मागविलेली आहे. अपिलार्थी यांना पंचायत समिती स्तरावरील कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिनांक १६.२.२०२३ व दिनांक ०२.३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०५ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र./ ९८७६ दि. ०७/०९/२०२३